UGC SPONSORED

(Under CPE Scheme)

# NATIONAL SEMINAR

On

# The Indira Gandhi Era in India's Democracy

18 February, 2017



Organised by

**Post Graduate Department of Political Science and Reserch Centre**

Nanded Education Society's

## PEOPLE'S COLLEGE, NANDED

College with Potential for Excellence Re-accredited by NAAC with Grade 'A'

Scanned with CamScanner

आणीबाणीची घोषणा आणि पंतप्रधान इंदिरा गांधी
**डॉ. नवनाथ गोविंदराव अडकिणे** .................... 274-277
भारतीय राजकारणातील इंदिरा गांधीच्या योगदानाचे विश्लेषण
**डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे** .................... 278-287
इंदिरा गांधी यांच्या काळातील समाजवादी सुधारणा
**डॉ.विजय लक्ष्मण तरोडे** .................... 285-288
बांगलादेश निर्मितीमध्ये इंदिरा गांधींची भूमिका
**डॉ. स्मिता काशिनाथराव मरवाळीकर** .................... 289-292
बांगलादेशची निर्मिती व इंदिरा गांधी भारतातील दारिद्रय
बांगलादेशची निर्मिती व इंदिरा गांधी
**डॉ.पी.एस.लोखंडे** .................... 293-295
निर्मुलनामध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांचे योगदान
**किर्तीकर वाल्मीक भीमराव** .................... 296-301
इंदिरा गांधींचे परराष्ट्रविषयक धोरण : एक दृष्टिक्षेप
**मनिषा काशीनाथराव पाटील** .................... 302-308
अलिप्ततावादी चळवळीतील इंदिरा गांधींची भूमिका
**सौ. दुर्गादेवी तुकाराम गुडे** .................... 309-314
भारतातील इंदिरा गांधीचे कणखर नेतृत्व
**जळबा उमाजी हाटकर** .................... 315-317
इंदिरा गांधी यांचे अनुशासन पर्व व भारतीय लोकशाही
**हरिदास मरीबा भोईवार** .................... 318-321
भारतीय लोकशाही, जयप्रकाशांचे आंदोलन आणि आणिबाणी
**सपना ज्ञानोबा डिगोळे** .................... 322-328
भारतीय लोकशाहीची वाटचाल व इंदिरा शासनाची आणीबाणी
**नागनाथ यादवराव धुळेकर** .................... 329-334
भारतीय लोकशाही आणि आणीबाणीविषयक इंदिरा गांधी यांचा दृष्टिकोन
**मोरे संतोष भिमराव** .................... 335-342

Scanned with CamScanner

# भारतीय राजकारणातील इंदिरा गांधीच्या योगदानाचे विश्लेषण

**डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे**
विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक,
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय, देगलूर

आपल्या असाधारण व्यक्तिमत्वाने भारतीय राजकारण व समाजकारणावर आपला ठसा उमटविणारे अनेक व्यक्तिमत्व भारतात होवून गेले. या व्यक्तिमत्वाने राष्ट्रीय राजकारणासह आंतरराष्ट्रीय राजकारणालाही प्रभावित केले. महात्मा गांधी, पंडित नेहरु, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी व नरेंद्र मोदी या सर्वांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. प्रस्तुत लेखात इंदिरा गांधीचे व्यक्तिमत्व व त्यांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील योगदानाचे विश्लेषण केले आहे. स्वातंत्र्यानंतर एकमेव महिला पंतप्रधान व खंबीरपणे निर्णय घेवून त्यांची अंमलबजावणी करणारे व्यक्तिमत्व म्हणून इंदिरा गांधीची ओळख आहे. इंदिरा गांधीच्या योगदानाला समजून घेतल्याशिवाय भारताचे परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय राजकारणचा अभ्यास करता येणार नाही. भारतात जेंव्हा नोटबंदीचा विषय निघेल तेव्हा मोरारजी देसाई आणि नरेंद्र मोदीचे नाव घेतले जाईल. अगदी त्याचप्रमाणे आणिबाणीचा विषय निघाला की इंदिरा गांधीच्या राजकीय शैलीचा विषय चर्चीला जातो. भारतीय राजकारणाचे स्वरुप, पक्षीय संघटनेची चौकट व परराष्ट्र धोरणातील खंबीरपण आणण्याबाबत इंदिरा गांधीचे नाव आदराने घेतले जाते. स्वातंत्र्य चळवळीचा अनुभव, पंडित नेहरुंचे मार्गदर्शन, स्वातंत्र्यानंतरच्या सर्व घडामोडी व निर्णयाच्या प्रत्यक्षदर्शनी असल्यामुळे इंदिरा गांधींना भारतीय समाज व राजकारणाच्या बारकाव्याची माहिती होती. याच्याच जोरावर त्यांनी भारतीय राजकारणाला नवी दिशा व आयाम दिले.

जानेवारी १९६६ मध्ये अचानक ताश्कंद येथे लालबहादूर शास्त्रीचे निधन झाले. तद्नंतर काँग्रेस पक्षाने इंदिरा गांधीस आपला नेता निवडले. या



Scanned with CamScanner

युद्धाचा फायदा घेवून इंदिरा गांधी भारतातील आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक श्रेष्ठ नेता अशी प्रतिमा तयार केली. त्यांच्याकाळात कांही विवादास्पद घटनाही घडल्या. त्यांच्या शासन कालाचा अभ्यास करता त्यांना सर्वच स्तरावर अनेक समस्यांचा सामना करावा लागला. तर एक स्त्री म्हणूनही बऱ्याच लोकांच्या प्रश्नास उत्तरे द्यावे लागली. इंदिरा गांधीच्या सर्वांगिण भूमिकांना खालीलप्रमाणे समजावून घेता येईल.

राजकीय :

१९६७ च्या विधानसभा निवडणूकीत अनेक राज्यात अस्थिर आघाडी शासनाची उदय झाला. ज्यात गैरकाँग्रेस शासनाचा उदय झाला. परिणामत: लोकसभा व राज्यसभेतील शासनाची ताकत कमी झाली. यामुळे देशाच्या राजकारणावरील काँग्रेसचे वर्चस्व कमी होवू लागले. तर अंतर्गत गटबाजी आणि राष्ट्रविरोधी शक्तीमुळे राष्ट्राचे ऐक्य टिकवण्याचे दुहेरी आव्हान इंदिरा गांधीपुढे होते.

अशा परिस्थितीला इंदिरा गांधींनी आपल्या अनुभवाची शिदोरी, विशिष्ट व्यक्तिमत्व आणि लोकांसोबत सरळ संवाद साधणे व भेटण्याच्या वृत्तीने या समस्यांना सोडवले. काँग्रेस संसदीय आणि विधीमंडळात दोन्हीकडे आपले बहुमत सिध्द करुन त्यांनी सिंडिकेटच्या राजकारणाला उत्तर दिले. राष्ट्रपती पदाचे उमेदवार व्ही.व्ही.गिरीच्या बाजूने काँग्रेस प्रतिनिधींना मतदान करण्याचे आवाहन केले. तेव्हा काँग्रेसचे विभाजन सिंडिकेट आणि इंदिरा गांधी असे झाले होते. सिंडिकेट राजकारण त्यांना पक्षातून हाकलून देण्याच्या विचारात होते. अशा परिस्थितीत इंदिरा गांधींनी दक्षिणपंथी आणि सांप्रदायिक समूहांशी हाथ मिळवून वेळेच्या आधी एक वर्ष निवडणूका घेवून २/३ बहुमत मिळवले. यावरुन त्यांनी भारतातील आपली लोकप्रियता सिध्द केली. त्यांच्यासाठी जनता आणि तिचे हित सर्वश्रेष्ठ होते तर लोकांसाठी त्या सर्वश्रेष्ठ होत्या.

१९७१ ला बांग्लादेश मुक्ती युध्दामुळे १० लाख शरणार्थींच्या व्यवस्थेमुळे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. तर १९७२ ला संपूर्ण देशात भिषण कोरडा दुष्काळ पडला. मुद्रास्फीतीचा दर सातत्याने वाढत होता. १९७३ ला कच्च्या



Scanned with CamScanner

तेलाच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाली. आर्थिक अस्थिरता राजकीय अशांततेस कारणीभूत ठरली. १९७४ च्या रेल्वेच्या संपाने जिवनावश्यक वस्तूच्या पुरवठ्यास पुर्णतः थांबवले. तर याहीपेक्षा गंभीर परिणाम करणारी घटना म्हणजे जयप्रकाश नारायण यांची समग्र क्रांतीचे आंदोलन होय.

अभिव्यक्तिचे स्वातंत्र्य आणि राजकीय आंदोलन करण्याचा अधिकार राज्यघटनेने दिला. जयप्रकाश नारायणांचे आंदोलन उत्तर भारतातील हिंदी भाषिक राज्य आणि इतर कांही क्षेत्रात मर्यादित प्रमाणात पसरले होते. यामुळे जयप्रकाश नारायणांनी पोलिस आणि सैनिकांना आवाहन करुन शासनाच्या आदेशाचे पालन करण्याची विनंती केली. तर दूसरीकडे अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधीच्या नियुक्तीलाच अवैध घोषित केले. सेना, पोलिस आणि शासकीय कर्मचाऱ्यांनी अशा असंवैधानिक व अलोकप्रिय शासनाच्या आदेशाचे पालन करु नये असे जयप्रकाश आपल्या भाषणातून जनतेला सांगु लागले. लोकशाही आणि राज्यघटनेवरील या संकटांचा खंबीरपणे सामना करण्यासाठी इंदिरा गांधीनी कलम ३५२ अंतर्गत २६ जून १९७५ ला आणिबाणीची घोषणा केली. आणिबाणीच्या घोषणेनंतर सर्व विरोधकांना तुरुंगात डांबण्यात येवून नंतर सोडण्यात आले. १९७७ ला संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेवून इंदिरा गांधींनी निवडणुकीची घोषणा केली. या निवडणुकीत जनतेने इंदिरा गांधीच्या फॅसिस्टवादी प्रवृत्तीला नाकारले. जनतेच्या आदेशाला मान्य करुन राजीनामा दिला. सत्ताधारी पक्षाने त्यांच्याविरोधात षडयंत्र रचून त्यांना तुरुंगात टाकले. अशा स्थितित इंदिरा गांधी लोकांसाठी काम करत होत्या. दलितांवरील अत्याचाराला लोकभावनेचे स्वरुप देत होत्या. मोरारजी देसाई आणि चरणसिंग यांच्यातील वाढत्या तणावामुळे जनता पक्षाला आपला कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. परिणामतः १९७९ च्या शेवटी झालेल्या निवडणूकीत लोकांनी पून्हा इंदिरा गांधींच्या नेतृत्वाला बहुमताने मान्यता दिली.

यापूर्वी आसाम आणि पंजाब या राज्यातील घडलेल्या हिंसक, असंवैधानिक व लोकशाही विरोधी राजकीय घटनांनी इंदिरापूढे आव्हान निर्माण केले. परिणामतः राजकीय तणाव वाढला, हत्या व संघर्ष झाले. कट्टरपंथी व



Scanned with CamScanner

सांप्रदायिक दहशतवादाने उग्ररुप धारण केले. परिणामत: पंजाबमधील भिंद्रानवाले गटांनी स्वर्ण मंदीराला आपल्या ताब्यात घेतले. अशा परिस्थितीत इंदिरा गांधींना स्वर्ण मंदिरातून भिंद्रानवाले गटाच्या समर्थकांना हाकलण्यासाठी लष्करी कार्यवाही करावी लागली. “ऑपरेशन ब्लू स्टार” या नावाने त्याला ओळखले जाते. यामुळे स्वर्ण मंदिर आणि त्यातील शिख धर्मांच्या श्रध्देय वस्तु व बाबींचे अतोनात नुकसान झाले. ज्यामुळे ईंदिरा गांधी प्रतीचा शिखांमधील असंतोष वाढला. त्याचे रुपांतरण ३१ ऑक्टोबर १९८४ ला ईंदिरा गांधीच्या हत्येत झाले.

**आर्थिक :**

सातत्याने येणाऱ्या दुष्काळाच्या काळात ईंदिरा गांधींनी देशाचे नेतृत्व आपल्या हाती घेतले. तरी न डगमगता त्यांनी हरित क्रांतीचे धोरण स्विकारले. जे त्यांच्या आर्थिक व शेतीविषयक धोरणातील महत्वाचे धोरण होते. परिणामत: देश अन्नधान्या बाबत आत्मनिर्भर बनला. देशाला औद्योगिक क्षेत्रात आत्मनिर्भर बनवण्यासी पंडित नेहरुंनी स्विकारलेल्या धोरणाला ईंदिरा गांधीनी पुढे चालवले. परिणामत: भारताचे आयातीचे प्रमाण कमी झाले. जगासोबत चालण्याचे धोरण आर्थिक क्षेत्रात स्विकारण्याच्या दिशेने ईंदिराचे नेतृत्व प्रयत्नस्थ होते. बँकांचे राष्ट्रीयीकरण, एकाधिकार आयोगाची स्थापना, पेटेंट अधिनियमांचे पास होणे आणि प्रिव्ही पर्सची समाप्ती या सर्व घटनांनी भारतातील लोकांना देशाच्या संपत्तीचे मालक बनवले. शेती आणि कारखान्यातील सरंजामशाहीला संपवले. देशातील संसाधनास लोकांच्या घरापर्यंत पोहचवले.

बँकाच्या राष्ट्रीयकरणाने भांडवलदार आणि बँक यांच्यातील समन्वयास नष्ट केले. देशातील गुंतवणुक राष्ट्राच्या गरजेनुरुप देशाला मिळू लागली. बँकाच्या शाखा आणि आर्थिक सेवा व सुविधा ग्रामीण भारतापर्यंत पोहचू लागल्या. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्व व योगदान वाढू लागले. गावातील सावकारांच्या शोषणावर नियंत्रण बसवले. हस्तकला व हस्तशिल्प कामगारांना अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणले. सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाचा विकास करण्यात आला. गरीब आणि वंचितांच्या आर्थिक मदत व स्वयंरोजाराच्या संधी देण्यासाठी व सामाजिक कल्याणच्या उपायांसाठी बँकेचे माध्यम व तंत्र

उपलब्ध झाले. इंदिरा गांधीनी गरीबी हटावचा कार्यक्रम राबवला. त्यांचा २० कलमी कार्यक्रम आधुनिक कल्याणकारी राज्याचा पाया बनला.

एकाधिकार आयोगाने मार्केटवरील आपल्या प्रभावाचा फायदा घेवून ग्राहक आणि संभाव्य व्यापारी स्पर्धकांचे नुकसान करणाऱ्या मोठ्या उद्योजकांवर नियंत्रण ठेवले. पेटेंट अधिनियमामुळे उद्योगपती व उद्योजकांना औद्योगिक प्रगतीसाठी तंत्रज्ञान आविष्कारास उपयोगात आणल्यावर पडणारा ताण सहन करण्याचे संरक्षण मिळाले. बोटावर मोजण्या इतपत लोकांचे वर्चस्व संपवल्याशिवाय आणि करोडो लोकसंख्या असलेल्या मध्यमवर्गास प्रगतीचे द्वार खुले केल्याशिवाय उदारीकरण आणि जागतिकीकरणासाठी भविष्याचे प्रक्रिया शक्य नव्हती. त्यासोबतच सार्वजनिक क्षेत्रातील ओएनजीसी, कोल इंडिया आणि सेल यांसारख्या भारतीय कंपन्यांना श्रेष्ठ बनवण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

उच्च शिक्षण आणि कौशल विकासाचे कार्यक्रम इंदिराजींच्या नेतृत्वात एम्स आणि आयआयटीचया रुपाने यशस्वीतेच्या शिखरावर चढले. यात इंदिराजींनी व्यवस्थापन अभ्यास, डिजाईन, संस्थान, जनसंचार माध्यमांचा समावेश अभ्यासक्रमात करुन नव्या वेगळ्या आणि प्रगतशील मार्गांना जोडले. सरंजामी व्यवस्थेतील प्रतिनिधींच्या विशेषाधिकारांच्या समाप्तीमुळे सामाजिक व्यवस्थेत बदल झाला. परिणामतः अनादिकाळापासून शोषण व जाचात जगणाऱ्यांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली. या सर्वांमुळे इदिरा गांधी सर्वसामान्यांसाठी देवदूत बनल्या. देशाने अनेक आर्थिक संकटांचा सामना केला तरी इंदिरा गांधींनी स्वतःच्या नेतृत्व कौशल्याने देशाच्या आर्थिक विकासाला तीव्र गतीने पुढे नेले. आणिबाणीच्याही काळात देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक बाबींकडे लक्ष दिले.

**सामाजिक :**

इंदिरा गांधीच्या विकासाचा केंद्रबिंदू सामाजिक न्याय होते. लोकांच्या गरजा लक्षात घेवून आर्थिक धोरण ठरवले. दारिद्र्य व गरीबी निर्मुलनाचे कार्यक्रम बनवले. ज्यामुळे समाजातील गरीब आणि वंचितांच्या हिताचे संरक्षण आणि



Scanned with CamScanner

निर्मूलन करण्याच्या दिशेने देशाचे ध्यान आकर्षित केले. अल्पसंख्यांक, अनुसूचित जाती, जमाती आणि महिलांशी संबंधित प्रश्नांच्या समाधानासाठी विशेष उत्तर शोधणे आवश्यक असल्याची जाण इंदिराजींना होती. राष्ट्राच्या एकीकरणासाठी सामाजिक न्यायासोबत विकासाच्या संपूर्ण यंत्रणेत विशेष लक्ष ठेवावे लागते.

देशातील वाढत्या सांप्रदायिक व राष्ट्रविरोधी शक्तींचा सामना सक्षमपणे बौध्दीक चातुर्य व राजकीय अनुभवाच्या जोरावर इंदिरा गांधीनी केला. अहमदाबाद, भिवंडी, जळगाव, अलिगढ या भागातील सांप्रदायिक समस्या सहजपणे सोडवल्या. अनुसूचित जाती-जमाती, आदिवासी, वृध्द, बालके व महिलांच्या सबलीकरणासाठी पंचवार्षीक योजनेसह विविध आयोग व समितीची स्थापना करून त्या सोडवण्याबाबत सकारात्मक लोकतांत्रिक भूमिका घेतली. महिला विद्यापीठ व महिला अभ्यास केंद्राची स्थापना केली. महिला व समाज कल्याण मंत्रालयाचे गठण केले. मुलींचे शिक्षण, महिलांचे आरोग्य, कुटूंब कल्याण आणि महिलांच्या गरजपूर्तीशी संबंधित विषयासह पर्यावरणास शासकीय कार्यक्रमात जागा देण्यात आली.

**परराष्ट्र धोरण :**

इंदिरा गांधीच्या योगदानाचा अभ्यास करता परराष्ट्र धोरण या विषयास बाजूला ठेवून केलेला अभ्यास अपूरा असेल. कारण या क्षेत्रात त्यांची भुमिका नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाचा तात्वीक ढाचा न बदलता त्याच्या कार्यवाहीच्या पध्दतीत बदल करणारी होती. १९७१ ला बांग्लादेश मुक्ती आंदोलनाचे समर्थन करुन पाकिस्तान सोबतच्या युध्दातील विजयामुळे इंदिराजींच्या परराष्ट्र धोरणाची संबंध जगभर स्तुती करण्यात आली. परराष्ट्र धोरणात संयमी व धैर्याने पावले टाकावीत याचे ते प्रतीक होते. हेन्री किंसींजरच्या प्रयत्नाने १९७० च्या दशकात अमेरिका-चीन-पाकिस्तान या त्रिकुटाने भारताच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केले. याला प्रतिउत्तर म्हणून इंदिरा गांधीनी १९७१ ला सोव्हिएत रशियासोबत २० वर्ष संरक्षणाच्या मैत्री व सहकार्याचा करार केला. या कराराने त्यांच्या राजनयिक व कुटनीतीक कौशल्याची ओळख संबंध जगाला झाली. अनेक युरोपीयन देश आणि अमेरिकेचा दौरा करून संबंध जगाला

पाकिस्तानमधील हालचाली व त्याचा होणारा त्रास याबाबत समजवले. भारताला सातत्याने अमेरिकेच्या अण्वस्त्राचा वाढता दबाव लक्षात घेवून इंदिरा गांधीने अणुचाचणी करुन भारताची आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रतिष्ठा उंचावली. तसेच NPT सारख्या भेदभावपूर्ण व विषमतायुक्त कराराने अण्वस्त्र नि:शस्त्रीकरण शक्य नाही. जोपर्यंत जागतिक अधिक अण्वस्त्रधारी राष्ट्र अण्वस्त्राची निर्मिती बाबत व त्यास नष्ट करण्याबाबत निश्चित वेळ ठरवत नाहीत. तोपर्यंत इतर देश कांही भूमिका घेणार नाहीत. आपल्या अण्वस्त्र क्षमतेची जगाला चुणूक दाखवली. तसेच जागतिक अण्वस्त्र नि:शस्त्रीकरणाबाबतच्या चर्चेला प्रारंभ केले. १९८३ साली नवी दिल्ली येथे अलिप्ततावादाचे संम्मेलन घेतले. या संम्मेलनाचे अध्यक्षस्थान भुषविले. नाम हे जगातील सर्वात मोठे शांती आंदोलन आहे. या व्यासपीठावरुन त्यांनी जागतिक शांतता, नि:शस्त्रीकरण, विकासाचा समतोल यांसारख्या बाबी जगासमोर मांडल्या. इंदिराजींचे परराष्ट्र धोरण आपले आंतरिक स्वातंत्र्य सुदृढ करणे व देशाच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचे संरक्षण करण्यावर भर दिला.

भारत आणि चीन संबंधातील सुधारणा या काळापासून सुरु झाल्याचे जाणवते. त्यास अधिक सावधगिरीने पुढे चालवले तर अफगाणिस्तानबाबत १९७९ ला सोव्हिएत रशियाने घेतलेल्या भुमिका व कार्यवाहीचे खंडण व निषेध करुन सोव्हिएत रशियाने तात्काळ अफगाणिस्तानातून आपले सैन्य बाहेर काढून घ्यावे असे ठणकावले.

**संदर्भ ग्रंथ :**


१) स्वांतत्र्योत्तर भारतीय राजकी विचारवंत - डॉ.वा.भा.पाटील

२) आणिबाणी आणि आम्ही.


****